आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ नोव्हेंबर २1०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यापासून ४६ हजारांहून अधिक नागरिकांवर प्रतिबंधात्मक कारवाई, २५२ कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता जप्त

- राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर संजय वर्मा यांची नियुक्ती

- राज्याच्या विविध भागात उमेदवारांच्या प्रचारसभा, जळगावमध्ये अपक्ष उमेदवाराच्या प्रचारसभेत गोळीबार

- वंचितचा जाहीरनामा प्रसिद्ध, काँग्रेसचा जाहीरनामा उद्या प्रसिद्ध होणार

**आणि**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कालपर्यंत एकंदर ४६ हजार ६३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या कालावधीत राज्यात २५२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

सी-व्हिजिल ॲपवर प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यांपेक्षा जास्त तक्रारी निकाली काढण्यात आल्या. २८८ पैकी १८५ मतदारसंघांमध्ये एक, १०० मतदारसंघांमध्ये दोन, तर ३ मतदारसंघांमध्ये तीन बॅलेट युनिट्स लावण्यात येणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मतदानाच्या सुरुवातीला आणि मतदान संपल्यानंतर मतदान यंत्रांमध्ये किती चार्ज आहे, याची नोंद ठेवण्याच्या शिवसेना

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मागणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निर्णय घेऊ, असं ते म्हणाले. यावेळी बोलताना ते म्हणाले,

**बाईट- एस. चोक्कलिंगम.**

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर आज संजय वर्मा यांची नियुक्ती झाली. ते १९९० च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२८ मध्ये ते निवृत्त होणार आहेत.

काँग्रेस आणि इतर पक्षांनी केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवण्याचे आणि त्यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश दिले होते. तसंच विवेक फणसळकर यांच्याकडे या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपवला होता.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या दौंड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारीपदावर प्रांताधिकारी मिनाज मुल्ला यांच्याऐवजी उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीतील अपक्ष उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यापूर्वी त्यांच्याशी पक्षपातीपणाने वागणे, निवडणूक लढविण्यापासून वंचित ठेवून शासनाचा महसूल बुडवणे अशा तक्रारी निवडणूक आयोगाकडे दाखल झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात दिंडोरी आणि देवळाली इथल्या उमेदवारांचे एबी फॉर्म शिवसेनेनं हेलिकॉप्टरनं पाठवले होते. या हेलिकॉप्टरचा खर्च पक्षाचा खर्चामध्ये पकडण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करायच्या आधीचा हा खर्च असल्याने तो पक्षाच्या खर्चात धरला जाणार आहे.

**<><><><><>**

विविध राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांना राज्यात सुरुवात झाली आहे. प्रचाराला केवळ १४ दिवसांचा कालावधी असल्यानं प्रभावी प्रचारावर उमेदवारांचा भर दिसून आला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामतीत शिर्सुफळ गावात पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या समर्थनार्थ प्रचार सभा घेतली. राज्यसभेचा आताचा कार्यकाळ संपल्यावर पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल, असं शरद पवार यावेळी म्हणाले.

**कोल्हापुरातल्या** राधानगरी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार के पी पाटील यांच्या प्रचारार्थ पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज प्रचारसभा घेतली. महाराष्ट्र लुटून गुजरातला नेण्याच्या हेतूनेच महाविकास आघाडीचं सरकार पाडल्याचा आरोप ठाकरे यांनी यावेळी केला.

**सातार्‍यात** कोरेगाव इथं शिवसेनेचे उमेदवार महेश शिंदे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा झाली.

उपमुख्यमंत्री आणि **नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे** उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं जनसंपर्क रॅली काढून प्रचाराचा प्रारंभ केला. आपल्याला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून मतदारच आपल्याला निवडून आणेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**नागपूर** उत्तर मतदारसंघाचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी देखील आज शहराच्या विविध भागात प्रचार केला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उमेदवार दिल्यामुळे महायुतीचाच फायदा होणार असल्याचा विश्वास केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आज **नाशिकमध्ये** घेतलेल्या पत्रकार परिषेदत व्यक्त केला.

**धुळे** जिल्ह्यात निवडणूक लढविणार्या  अपक्ष उमेदवारांना आज चिन्ह वाटप करण्यात आलं.

**<><><><><>**

जळगाव जिल्ह्यातल्या मुक्ताईनगर-बोदवड मतदार संघातले अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांची प्रचार रॅली सुरू असताना दोघाजणांनी त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबाराच्या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नाही.

**<><><><><>**

अलिबाग-मुरुड मतदारसंघाचे भाजपचे पदाधिकारी दिलीप भोईर यांचं पक्षातून ६ वर्षासाठी निलंबन करण्यात आलं आहे. महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्याविरुद्ध त्यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यानं निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचं भाजप खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीनं आज पुण्यामध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते जोशाबा समतापत्र हा पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. जोशाबा समतापत्र हे आरक्षण बचाव यात्रा, बौद्ध समाज संवाद दौरा आणि आदिवासी सत्ता संपादन परिषदेत मिळालेल्या जनहितोपदेशातून व सूचनांवरून तयार करण्यात आले आहे. ओबीसी समाजाचा लढा आज वंचित बहुजन आघाडी लढत आहे, त्यामुळे हा वर्ग आपल्या बरोबर येईल, अशी आपली अपेक्षा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा उद्या प्रसिद्ध होणार आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी उद्या मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलात त्याचं प्रकाशन होईल. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील. या सभेला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेते

शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाविकास आघाडीतले प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

या जाहीरनाम्यात आपला पक्ष जनतेला उन्नतीसाठी गॅरंटी देणार आहे. आज विविध क्षेत्रात मागे पडलेल्या महाराष्ट्राला पुन्हा अग्रेसर करण्यासाठी आपण पाच गॅरंटी जनतेसमोर देणार आहोत, असं विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

सातारा जिल्ह्यात पुणे -बेंगलोर महामार्गावरच्या शेंद्रे गावाजवळ पोलिसांनी आज केलेल्या कारवाईत सुमारे ९५ लाख रुपयांची बेहिशोबी रोख रक्कम जप्त केली. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतलं असून ते नवी मुंबईहून हुबळीला जात होते.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या २५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. हे अधिवेशन २० डिसेंबरपर्यंत चालवण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू यांनी आज समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमधून दिली. २६ नोव्हेंबरला भारतीय संविधानाचा स्वीकार करण्याच्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण होत असून त्याचा अमृतमहोत्सवी सोहळा साजरा केला जाणार असल्याचंही रिजीजू यांनी सांगितलं.

**<><><><>**

अमेरिकेतल्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकांमुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा नकारात्मक प्रभाव आज जागतिक बाजारात उमटला. मुंबई शेअर बाजारातही आज दिवसभर मोठे चढ-उतार दिसून आले. बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६९४ अंकांनी वधारला आणि ७९ हजार ४७७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २१८ अंकांनी वधारला आणि २४ हजार २१३ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या सृजन २०२४ या दहा दिवसांच्या निवासी कला शिबिरात अमरावती जिल्ह्यातल्या मेळघाटातल्या सुमित्रा आहके सहभागी झाल्या होत्या. या शिबिरात सुमित्रा यांनी काढलेली वारली चित्रं, गाव आणि शहरातील फरक दर्शविणारं चित्र, देवस्वरुप मानला जाणारा वाघ आणि लुप्त होत चाललेले आदिवासी कलाप्रकार रेखाटले. शिबिरासाठी निवडलेल्या १५ जणांमध्ये सुमित्रा आहके यांना दुसरा क्रमांक मिळाला. शिबिराच्या समारोपावेळी राष्ट्रपती मुर्मू यांनी सुमित्रा आहके यांना प्रमाणपत्र, चषक आणि भेटवस्तू देऊन सन्मानित केलं.

**<><><><>**

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी १२ परदेशी कासवं जप्त केली. काल बँकॉकहून आलेल्या २ प्रवाशांच्या सामानाची तपासणी केली असता खाद्यपदार्थांच्या पाकिटांमध्ये या परदेशी कासवांच्या प्रजाती सापडल्या. या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><>**

अग्नीवीर योजने अंतर्गत, एप्रिल 2024 मध्ये झालेल्या ऑनलाइन CEE चाचणीत निवड झालेल्या, महाराष्ट्रातल्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, नाशिक, ठाणे, पालघर, रायगड, धुळे, आणि नंदुरबार या आठ जिल्ह्यांमधल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी भारतीय लष्कराने येत्या २८ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर या कालावधीत विरारमधल्या जीवदानी मैदानावर भरती रॅली आयोजित केली आहे.

**//<><><><><>//**